Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ८४ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१७ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# योजनांपासून वंचित राहिलेल्यांना संकल्प यात्रेसोबत जोडा-केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी

## हखेमजई येथे विकसीत भारत संकल्प यात्रेचे आयोजन;हद्रदृष्यप्रणालीद्वारे पंतप्रधानांचा संवाद





**वरोरा (प्रतिनिधी)–केंद्र शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या विकसीत भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून जवळपास २२ योजनांची माहिती नागरिकांच्या घरापर्यंत पोहचविण्यात येत आहे. शासकीय यंत्रणेतील अधिकारी – कर्मचारी लोकांमध्ये जावून याबाबत जनजागृती करीत आहे. त्यामुळे आतापर्यंत विविध योजनांपासून वंचित राहिलेल्या नागरिकांना या यात्रेसोबत जोडा व त्यांना लाभ मिळवून द्या, असे आवाहन केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी केले. तर दूरदृष्यप्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राज्यातील लाभार्थ्यांशी संवाद साधला.वरोरा तालुक्यातील खेमजई येथे विकसीत भारत संकल्प यात्रेदरम्यान आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंचावर राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी आदी उपस्थित होते.**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीपथावर मार्गक्रमण करीत आहे, असे सांगून केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी म्हणाले, गत ९ वर्षात जे काम झाले आहे, आणि भविष्यात केंद्र सरकार नागरिकांच्या कल्याणासाठी जे काम करणार आहे, अशा बाबींची माहिती या संकल्प यात्रेतून जनतेपर्यंत पोहचविण्यात येत आहे. सोबतच महत्वाच्या विविध शासकीय योजनांचा लाभसुध्दा या माध्यमातून नागरिकांना घरपोच मिळण्यास मदत होत आहे. त्यामुळे या यात्रेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे. योजनांपासून वंचित असलेल्यांना यात सहभागी करावे. विकसीत भारत संकल्प यात्रेअंतर्गत देशभरात ३२०० एलईडी व्हॅनद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. आतापर्यंत सदर व्हॅन ६५ हजार गावांमध्ये आणि ५ हजार शहरात गेली असून 'मेरी कहानी, मेरी जुबानी' अंतर्गत १ कोटी ८० लक्ष लाभार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले आहे.

पुढे ना. पुरी म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यात सुरवातीला १०२ पेट्रोलपंप होते, आज १३१ पेट्रोलपंप आहेत. २०१४ मध्ये जिल्ह्यात ३ लक्ष ३४ हजार एल.पी.जी गॅस कनेक्शन होते. ती संख्या आज चंद्रपूर जिल्ह्यात ६ लक्ष ३२ हजार झाली असून जिल्ह्यातील ३४४९५ कुटुंबांना उज्वला गॅस योजनेचा लाभ देण्यात आला आहे. २०१४ मध्ये देशात १४ कोटी नागरिकांकडे गॅस कनेक्शन होते. आता २०२३ मध्ये हा आकडा ३२ कोटींवर पोहचला आहे. सन २०१४ पर्यंत केवळ १ लक्ष ५ हजार नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळाला होता, तर २०१४ पासून २०२३ पर्यंत ग्रामीण आणि शहरी मिळून ४ कोटी नागरिकांना आवास योजनेंतर्गत घरकूल देण्यात आले आहे. गत सरकारमध्ये देशातील १८ हजार गावांमध्ये वीज नव्हती तर आज २०२३ पर्यंत ६ लक्ष ५० हजार गावांमध्ये विद्युतीकरण झाले आहे. तसेच देशात आजच्या घडीला ५० कोटींपेक्षा जास्त लोकांचे बँकखाते काढण्यात आले आहे. तसेच आज जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे, भविष्यात ती तिस–या क्रमांकावर पोहचणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाकार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, जिल्ह्यातील ८२५ ग्रामपंचायतींपैकी आतापर्यंत २७३ ग्रामपंचायतींमध्ये विकसीत भारत संकल्प यात्रा गेली आहे. यात एकूण १ लक्ष ४२ हजार ५९५ नागरिक सहभागी झाले आहेत. यात्रेदरम्यान १७५५८ कुटुंबाची आरोग्य तपासणी, २५५७ जणांची उज्वला गॅस कनेक्शनकरीता नोंदणी, ६३०० जणांना आयुष्मान भारतचा लाभ देण्यात आल्याचे जिल्हाधिका–यांनी सांगितले.सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाला विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विकसीत भारत या संकल्पात चंद्रपूरचे मोठे योगदान राहील : पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार

केंद्र सरकारने नागरिकांच्या कल्याणासाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. शेतक–यांच्या खात्यात ६ हजार रुपयांचा थेट लाभ, आयुष्मान भारत अंतर्गत मोफत आरोग्य सेवा आदी योजनांचा यात समावेश आहे. या योजनांपासून कोणीही वंचित राहू नये म्हणून चित्ररथ आल्या दारी येत आहे. गावातील लोकांनी या योजनांचा फायदा घ्यावा. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात विकसीत भारत हा संकल्प आहे. जग बदलविण्यासाठी आपणही संकल्प करणे गरजेचे आहे. जिल्ह्यात मिशन शौर्य, मिशन जयकिसान, मिशन ऑलंपिक, अयोध्येच्या राममंदिरासाठी काष्ट, नवीन संसद भवनासाठी चंद्रपूरचे लाकूड अशा अनेक बाबी करण्यात आल्या आहेत. चंद्रपूर हा वाघांचा जिल्हा असल्यामुळे विकसीत भारत या संकल्पात चंद्रपूरचे मोठे योगदान राहील, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

# आर के हायस्कुलचे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनी मध्ये घवघवीत यश

**पुलगाव (प्रतिनिधी)**

यशवंत विद्यालय देवळी, येथे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले .यामध्ये आर. के .हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच आर. के .ज्ञान मंदिरम पुलगाव यांच्या सहापैकी चार प्रतिकृतींना प्राविण्य प्राप्त झाले.




दि.१५,१६ डिसेंबरला वर्ग ९ ते १२ च्या विद्यार्थी गटामध्ये आर. के. ज्युनिअर कॉलेजला प्रथम क्रमांक मिळाला तर आर. के .ज्ञान मंदिरमला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. वर्ग ६ ते ८ च्या गटामध्ये अमित उमरे यांच्या अध्यापक प्रतिकृतीला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. प्रयोगशाळा सहाय्यक किंवा परिचर या गटामध्ये विनोद माहुरे यांच्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक प्राप्त झाला.यामध्ये सर्व सहभागी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सहभागी विद्यार्थी यांचे आर. के. हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष हरिप्रकाश केजरीवाल , शाळा समिती अध्यक्ष रंजनकुमार केजरीवाल, संस्थेचे सर्व सन्माननीय विश्वस्त,संस्थेचे मुख्य समन्वयक नुरसिंह जाधव , संस्थेचे प्राचार्य संजय सहारे, उपमुख्याध्यापिका माया वंडलकर , उपप्राचार्य सुनिल भोयर , पर्यवेक्षक गणेश इंगळे , पर्यवेक्षक यादव ,आर .के. ज्ञानमंदिरांच्या मुख्याध्यापिका राजश्री ओक तसेच आर. के .परिवारातील सर्व शिक्षक शिक्षकेतकर कर्मचारी बंधू-भगिनींनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

# धनश्री नागरी पत संस्थेच्या अध्यक्षपदी सुभाष पाकमोडे तर सचिवपदी प्रा.स्मिता हांडेकर



**मूल । प्रतिनिधी**

तळोधी येथील धनश्री नागरी सहकारी पत संस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत सुभाष पाकमोडे यांची अध्यक्षपदी तर प्रा. स्मिता हांडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सभेचे अध्यक्ष, अध्यासी अधिकारी पी.एन. गौरकर यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्याची अविरोध निवड केल्याची घोषणा केली.यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष नानासाहेब पोषट्टीवार, मनोज हंबर्डे, गहाणे उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेच्या सभागृहात नवनिर्वाचित व निवृत्त झालेल्या संचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक सुरेश सेलोकर, सुखदेव भाकरे, गणेश तर्वेकर, सचिन चिंतावार, सुनील मदनकर, लोकेश कोकाटे, पियूष मुगले, पुष्पलता बोरकर, परिनीता खोब्रागडे यांची उपस्थिती होती.

# शालेय पोषण आहारातील अंडी व केळी योजना बाजारभाव प्रमाणे देण्याचे शासनाचे आश्वासन

**मूल । प्रतिनिधी**

शासनाने शालेय पोषण आहारातंर्गत विद्यार्थ्यांना या महिन्यापासून आठवड्यातून १ दिवस अंडी व केळी हा सकस आहार देण्यास देण्यास सुरुवात केली असून लवकरच बाजारभावाप्रमाणे अंडी व केळी चे दर निश्चित केले जातील असे आश्वासन शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव इम्तियाज काझी यांनी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या शिष्टमंडळास दिले.नागपूर मंत्रालय येथे पुरोगामी शिक्षक संघटना प्रतिनिधी मंडळाने शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव इम्तियाज काझी यांची भेट घेवून अंडी व केळी साठी पाच रुपये हे बाजारभावापेक्षा कमी असल्याने सदरचा दर बाजारभाव प्रमाणे देण्यात यावा अशी मागणी केली होती. याबाबत पुढील निधी देतांना बाजारभाव पाहून निश्चित केला जाईल असे शासनाच्या वतीने सांगण्यात आले.यावेळी ज्या शाळांना अजूनही निधी प्राप्त झाला नाही तो निधी लवकर पाठवण्यात यावा, सकस आहार निधी किमान १५ दिवस आधी खात्यावर जमा करण्यात या मागण्यांबाबतही सकारात्मक चर्चा झाली.शिष्टमंडळात संघटनेचे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरीश ससनकर, राज्य कार्याध्यक्ष प्रकाश पाध्ये, राज्य



उपाध्यक्ष जी. एस मंगनाळे कोल्हापूर जिल्हाध्यक्ष एस.के.पाटील, चंद्रपुर जिल्हाध्यक्ष किशोर आनंदवार, वाशिम जिल्हाध्यक्ष इरफान मिर्झा, अकोला जिल्हाध्यक्ष संघर्ष सावरकर, रत्नागिरी नेते प्रदीप पवार, जालना जिल्हाध्यक्ष दिनकर पालवे,कोल्हापूर जिल्हा सरचिटणीस तुषार पाटील वाशिम जिल्हा सरचिटणीस प्रदीप गावंडे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष जीवन भोयर, लोमेश येलमुले, कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत टिपूगडे, वाशिम जिल्हा उपाध्यक्ष भाऊराव शिंदे, नागपूर अध्यक्ष लिलाधर सोनवणे, सरचिटणीस विनोद गवारले आदी उपस्थित होते .

# ग्रामगीता वाचणारा कधीही भ्रष्टाचाराच्या मार्गावर जावू शकत नाही–डॉ.आगलावे

**भद्रावती । प्रतिनिधी**

ग्रामगीता वाचून त्याची शिकवण अंगिकारणार कधीही भ्रष्टाचाराच्या मार्गावर जात नसल्याचे प्रतिपादन श्री गुरूदेव प्रचारक, डॉ. अंकुश आगलावे यांनी भद्रावती तालुक्यातील विसलोन येथील महिला गुरूदेव सेवा मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमास केले.डॉ. आगलावे पुढे म्हणाले की, कोरोना काळात गुरूदेव सेवा मंडळाच्या प्रचारकांनी घरोघरी जावून मदत पुरविली. ग्रामसभेच्या अधिकाराचा अधिकाधिक वापर करून गांव कसे विकसित करता येईल याकडे सर्वाने लक्ष देण्याची गरज आहे. आदर्श गांव करायचे असेल तर नेते मंडळानी राजकारण न करता समाजकारण केले तरच नक्कीच आदर्श गांव होण्यास कोणीही



आडकाठी आणू शकत नसल्याचे यावेळी सांगितले. याप्रसंगी गुरूदेव महिला सेवा मंडळाच्या वतीने डॉ. आगलावे यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी भद्रावती तालुक्यातील श्री. गुरूदेव प्रचारक मोठया संख्येने उपस्थित होते.

# विजेच्या धक्क्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**मूल । प्रतिनिधी**

तालुक्यातील उसराळा येथील शेतकरी देविदास इस्टाम वय वर्ष ३६ हे गुरुवार (ता.१४)आपल्या शेतात पीक उभे असल्याने ते पाहण्यासाठी शेतात जात होते,त्याच मार्गावर असलेल्या दुसऱ्या एका शेतकऱ्याने आपल्या शेतातील पीक वन्य प्राण्यांच्या उपद्रवापासून वाचवण्यासाठी शेतीच्या सभोवताल लावलेल्या तारेच्या कुंपनाला विदयुत करंट लावून ठेवला होता. ही बाब देविदासच्या लक्षात आली नाही. कुंपणास स्पर्श झाल्याने विजेच्या जबर धक्क्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.त्याच्यामागे पत्नी, दोन मुले आणी आई असा परिवार आहे.

# संपादकीय

## राजकीय समरसतेचा प्रयोग

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षावर पुरती पकड घेतल्यापासून धक्कातंत्र वापरले गेले नाही, तरच धक्का बसतो. दोन्ही राष्ट्रपतींच्या निवडीतही मोदींनी तेच केले. मग तीन राज्यांमध्ये खणखणीत विजय मिळाल्यानंतर प्रस्थापितांनी विस्थापित होणे, अपेक्षितच होते. अर्थात, शिवराजसिंह चौहान, डॉ. रमणसिंह आणि वसुंधरा राजे या सर्वाधिक माहीत असणाऱ्या त्या त्या राज्यातील नेत्यांना बाजूला ठेवून नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांनी जे नेते शोधून काढले; त्या मागे नेमके गणित दिसते. या तीनही राज्यांच्या विजयाचे श्रेय बव्हंशी मोदी यांच्या नावावर जमा झाले आहे. त्यामुळे, प्रबळ प्रादेशिक नेते–ज्यांना काँग्रेस काळापासून 'क्षत्रप' म्हणण्याची प्रथा आहे; त्यांना हालचाल करण्यास फारसा अवकाश नव्हता. विशेषत: राजस्थानात वसुंधरा राजे यांचे महत्त्व शून्यवत झालेले दिसते. छत्तीसगडमध्ये माजी मुख्यमंत्री डॉ. रमणसिंह विधानसभेचे अध्यक्ष होत आहेत. मध्य प्रदेशाचे विक्रमी मुख्यमंत्री शिवराजसिंह यांचा स्वभाव आणि त्यांच्याबद्दलची लोकभावना पाहता त्यांना भविष्यात केंद्रात कृषीसारखे खाते मिळाले, तर नवल नाही.मोदी यांच्या कामाची ही पद्धत पाहताना अनेकांना इंदिरापर्वाची आठवण होते. ते स्वाभाविक आहे. महाराष्ट्रात ए. आर. अंतुले यांच्यानंतर मुख्यमंत्री म्हणून बाबासाहेब भोसले यांचे नाव आले; तेव्हा अनेकांना त्यांचे पूर्ण नाव, मतदारसंघ आठवेना. भूपेंद्र पटेल यांना गुजरातेत आणताना मोदींनी हेच केले. आत्ताही राजस्थानचे नवे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा हे अनुभवी नेते असले तरी पहिल्यांदाच आमदार झाले आहेत. मोहन यादव मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री होणे, ही उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन्ही राज्यांतील यादव समाजाला मारलेली हाक आहे. त्यांचे दोन उपमुख्यमंत्री मात्र दलित आणि ब्राह्मण समाजातील आहेत. हेच सूत्र मोदींनी राजस्थान आणि छत्तीसगडमध्येही वापरले. 'सोशल इंजिनीअरिंग' हा शब्द अलीकडे लोकप्रिय असला, तरी भाजप आणि संघ परिवाराच्या भाषेत ही 'सामाजिक समरसता' आहे. या समरसतेचे राजकीय प्रात्यक्षिक मोदींनी तीनही राज्यांत करून दाखविले.कोणत्याही राज्यातल्या सर्वांत प्रबळ जातीला दूर सारून इतर जातींची भक्कम मोट बांधायचा पहिला प्रयोगही इंदिरा गांधी यांनीच ताकदीने केला. भाजपनेही हा प्रयोग केला आहे. मात्र, आत्ताचा प्रयोग वेगळा आणि 'जास्तीत जास्त जातींना जास्तीत जास्त जवळ' करण्याचा आहे. तो केवळ २०२४ वर लक्ष ठेवणारा नाही. पुढच्या अनेक दशकांचा विचार करून चालला आहे. मोदी स्वत: हे संघाचे स्वयंसेवक होते. त्यांना भाजपमध्ये पाठविलेच नसते, तर ते दिलेले काम करीत राहिले असते. तीनही नवे मुख्यमंत्री हे असेच स्वयंसेवक आहेत. व्यक्तिगत आकांक्षा व अहंकार बाजूला ठेवून दिलेले काम नीट करण्याची संस्कृती मोदी सत्तेच्या राजकारणात आणत आहेत. ती सत्तेच्या अंगभूत स्वभावाशी विसंगत असते. मात्र, 'केंद्राच्या योजना राज्यात नीट राबवा. मते मिळविण्याचे आम्ही पाहून घेऊ,' असा हा केंद्रद्वयीचा या नऊ जणांना सांगावा आहे.निवडून आलेल्या आमदारांनी नवा विधिमंडळ नेता निवडावा, हा संकेत मागेच निव्वळ सुभाषित बनला आहे. आत्ताही राज्यांमध्ये गेलेल्या केंद्रीय निरीक्षकांना मोदी–शहांचा निरोप देणे आणि काहींचे अश्रू पुसणे, यापलीकडे काम नव्हते. दखलपात्र बंडाची तर सुतराम शक्यता नाही. संसदीय लोकशाहीत असा कारभार चालावा का, हा त्यापुढचा मूलभूत प्रश्न आहे आणि मुख्यमंत्री हा आधी लोकनेता असावा, ही अपेक्षाही अवाजवी नाही. 'तीन तिघाडा, काम बिघाडा' अशी लोकोक्ती असली, तरी तीनही राज्यांत प्रत्येकी तिघांना एकत्र चालायला सांगण्यात 'कुरघोडी न करता परस्परांना सांभाळून घ्या' असा सुप्त इशारेवजा संदेश आहे. कोणत्याही पक्षात पिढीबदल हा महत्त्वाचा टप्पा असतो. तो वेळेत न होण्याचा तोटा कम्युनिस्टांसहित अनेक पक्षांनी सोसला आहे. भाजपमध्येही मोदींनी हा बदल अडवाणी व इतर नेत्यांवर लादलाच होता. तो बदल त्यांनी नंतर महाराष्ट्रात व इतरत्रही केला. तीन राज्यांमधले नवे नेतृत्व हा पिढीबदलाचाही भाग आहे. भाजपमध्ये संघातून आलेले, संघातून न आलेले, इतर पक्षांतून आलेले आणि गुणक्षमतांमुळे बाहेरून आणलेले अश्विनी वैष्णव किंवा एस. जयशंकर.. असे प्रमुख चार प्रकारचे नेते आहेत. त्यातल्या पहिल्या प्रकाराचे महत्त्व भाजपची ताकद वाढेल तसे वाढत जाणार; याचे ही निवड म्हणजे स्पष्ट सूचन आहे. मात्र, मोदी यांचे यश आणि करिष्मा हा अपवाद असतो. स्वत:चे चेहरे नसणारे नेते आणून सत्तेत बसविणे हे आदर्श वाटले तरी मोदींच्या स्वत:च्या 'चेहऱ्या'ची जी जादू सध्या चालते आहे; तिच्यामुळे हे शक्य होते आहे. मात्र, एकच लखलखता चेहरा आणि बाकी बरेच बिनचेहऱ्याचे यातल्या अंतर्विरोध आणि विसंगतीची किंमत काँग्रेसनेही मोजली आहे; हा धडा विसरण्याजोगा नाही.

## दोन मोटारसायकलची धडक अपघातात दोन्ही चालक जखमी

**पुलगाव** –स्थानिय टावरी पेट्रोल पंपाच्या समोर वर्धा मार्गावर मोटर सायकल व सायकल यांची टक्कर होऊन दोघेही स्वार गंभीर जखमी झाले.दि.१६ ला सायंकाळी ६–३० च्या दरम्यान वसंता सुखदेव म्हैसकाळ (वय ५७)राहणार कवठा झोपडी यांची सायकल व हबीबखा पठाण (वय ५६) राहणार लक्ष्मीनारायणपूर चौकी यांची मोटारसायकल या आपसात धडकल्या. यात दोघेही गंभीर जखमी झाले. ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता त्यांची रवानगी रुग्णवाहिकेद्वारे सावंगी रुग्णालयात करण्यात आली.पुढील तपास पुलगाव पोलीस करीत आहे.

## रस्त्याच्या गड्ड्यात पडून युवक जखमी

**पुलगाव**–स्थानिय पुलगाव – नाचणगाव रस्त्याचे सुरु असलेल्या कामासाठी आर. के. हायस्कुल जवळ, ईशा इण्डेण दुकानासमोर



खोदलेल्या खड्ड्यात पडून युवक जखमी झाला.दि.१६ ला सायंकाळी ७ च्या सुमारास पुलगाव हुन नागझरी येथे जाताना सागर सावरखेडे (वय २३) राहणार नागझरी यांची मोटरसायकल रस्त्यासाठी खोदलेल्या खडड्यात पडली.गाडी क्र. एम. एच.३४ ए ई ४६१७ यात तो जखमी झाला. अपघात बघताच जवळपासच्या जमलेल्या युवकांनी सागरला बाहेर काढले. एक आटो थांबवून ग्रामिण रुग्णालयात भरती केले.रस्त्याचे बांधकाम सुरु असताना कुठेही एकसुत्रता नाही. कुठेही केव्हाही काम सुरु केले जाते. सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीही खबरदारी घेतली जात नाही. खोदलेल्या गड्ड्याच्या बाजूला ब्रेकेट्स लावले जात नाही. त्यामुळे रोजच अपघात होत असतात.

# सहज आणि वैविध्यपूर्ण अभिनय - रवींद्र बेर्डे


कुठल्याही चित्रपट उद्योगात नायक, नायिका, चरित्र अभिनेते यांच्यासोबतच अशा अभिनेत्यांची एक मोठी फळी असते, जे सतत कुठल्या ना कुठल्या चित्रपटात दिसत राहतात, त्यांचे नाव श्रेयनामावलीत असते. परंतु चित्रपटाची चर्चा होते, तेव्हा त्यांच्या बऱ्या–वाईट अभिनयाची चर्चा क्वचितच होते. एखादा अभिनेता त्याच त्याच प्रकारच्या भूमिका करत असेल, तर त्यावर टीका होते. परंतु असे अनेक अभिनेते आहेत, ज्यांनी सातत्याने छोट्या छोट्या परंतु वैविध्यपूर्ण भूमिका केल्या. मात्र, त्यांचे व्हावे तसे कौतुक झाले नाही. रवींद्र बेर्डे हे त्यातलेच एक होते.'बेर्डे' या आडवानातच वैविध्य आणि कलागुण ठासून भरलेले आहेत, याचा प्रत्यय वारंवार आलेला आहे. रवींद्र बेर्डे यांचे व्यक्तिमत्वच असे होते की विनोदी, गंभीर, खलनायकी, प्रेमळ अशा कोणत्याही प्रकारची व्यक्तिरेखा त्यांना शोभत असे. भूमिका कुठलीही असो, रवींद्र बेर्डे तिची प्रकृती



हेरून स्वतःला लगेच त्या प्रकारच्या देहबोलीस आणि संवादफेकीस सुसंगत असे 'बेअरिंग' घेत. दीर्घकाळ 'आकाशवाणी'वर काम केल्याने त्यांना आवाजाची फेक, शब्दांतून अभिनय करण्याचा सराव होता. शिवाय नाटकांमधूनही अनेक भूमिका केल्याने आवश्यक तो लवचिकपणाही होता. मराठी चित्रपटांमध्ये अनेक 'स्टॉक कॅरेक्टर्स' असतात. गावचा पाटील, सरपंच, पोलिस अधिकारी, घरमालक, पोरीचा गरीब बाप किंवा पोराचा उर्मट बाप, गावगुंड, भटजी, मित्र, भला शेजारी.. यापैकी कुठल्याही व्यक्तिरेखेत सहज बसेल, असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.त्यांच्या चेहऱ्याला 'भरघोस मिश्या', 'फेटा', 'टोपी', 'फरची टोपी' शोभून दिसे. त्यामुळे अशोक सराफ–लक्ष्मीकांत बेर्डेचे चित्रपट, सचिन–महेश कोठारे यांचे चित्रपट आणि त्यानंतरचे 'अलका कुबल'छाप चित्रपट या सर्व प्रकारात त्यांना भूमिका मिळाल्या. मात्र, त्यांची लांबी अनेकदा दोन–तीन दृश्यांपुरतीही असे. चित्रपट यशस्वी किंवा अयशस्वी होण्यात अशा कलावंतांचा वाटा नसतो. परंतु त्यांच्याशिवाय चित्रपट तयार होऊ शकत नाहीत, हेही खरे. रवींद्र बेर्डे यांना श्रद्धांजली वाहताना या कलावतांचे हे श्रेय ठळकपणे लक्षात येते.

# निर्यातबंदीचा तडाखा

ग्राहककेंद्रित धोरणांना प्राधान्य देणाऱ्या या सरकारने पहिल्यांदा कांद्याला ४० टक्के निर्यातशुल्क लागू केले. त्यानंतर अवघा महिनाभरातच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आजवरच्या सर्वोच्च ८०० डॉलर प्रतिटन निर्यातमूल्याची मात्रा लागू करून समस्त शेतकरी आणि व्यापारीवर्गाला दणका दिला.तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालांनी आत्मविश्वास दुणावलेल्या भाजपप्रणित केंद्र सरकारने लागलीच कांदा निर्यातबंदी करून आगामी लोकसभा निवडणुकांचाही मार्ग प्रशस्त करण्याची खबरदारी घेतली. वास्तविक यंदा सरासरीपेक्षा कमी झालेले पर्जन्यमान आणि त्यातच कांद्याचे आगार असलेल्या महाराष्ट्रासह काही राज्यांत वर्षभरात दोनदा अवकाळीचा तडाखा बसल्याने या पिकाच्या उत्पादनात मोठी घट येणार असल्याचे संकेत मिळत असल्याने केंद्राकडून असा काहीतरी टोकाचा निर्णय घेतला जाईल, असा अंदाज आधीपासून बांधला जात होताच.ग्राहककेंद्रित धोरणांना प्राधान्य देणाऱ्या या सरकारने पहिल्यांदा कांद्याला ४० टक्के निर्यातशुल्क लागू केले. त्यानंतर अवघा महिनाभरातच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आजवरच्या सर्वोच्च ८०० डॉलर प्रतिटन निर्यातमूल्याची मात्रा लागू करून समस्त शेतकरी आणि व्यापारीवर्गाला दणका दिला. महाराष्ट्रापाठोपाठ कांदा उत्पादनात आघाडीवर असलेल्या मध्य प्रदेशातील विधानसभा निवडणुकीत भाजपला एकतर्फी विजय मिळाला, हेही विशेषच. निर्यातमूल्याचा दर तातडीने तीनशे डॉलरपर्यंत तरी कमी करण्याची मागणी होत असतानाच, नेमका उलट घाव घालून सरकारने आधीच ना–ना अडचणींमुळे घायकुतीला आलेल्या उत्पादकांना संकटाच्या खाईत ढकलण्याचे पातक केले आहे.पिकवणाऱ्यापेक्षा खाणाऱ्यांची शहरी मतपेढी मोठी आणि एकगठ्ठा असल्यानेच निर्यातबंदी लागू करताना, सरकारला फार कष्ट पडले नसतीलच. एकाला खूश करण्याच्या नादात दुसऱ्याच्या तोंडचा घास हिरावला जातो आहे, हा साधा विचारही केला गेला नाही. येत्या काळात दर आटोक्यात न आल्यास साठा मर्यादा घटविणे, छापासत्र यांसारखी



आयुधेही वापरली जातील, याबाबत शंका नाही. सद्यस्थितीत अवघी दहा–पाच टक्के होणारी निर्यात यामुळे थांबणार असली तरी सरासरी दर मात्र तीन हजारांवरून थेट पंधराशे रुपयांपर्यंत कोसळण्याची शक्यता आहे. हाताशी आलेला घास अल्प दरांत विकावा लागणार असल्याने उत्पादकांचा संताप झाला आहे. त्यामुळेच महाराष्ट्रासह देशातील काही राज्यांतील कांदापट्ट्यामध्ये रोष निर्माण होऊन केंद्राच्या धोरणांचा निषेध म्हणून रास्ता रोकोसारखी आंदोलन सुरू झाली आहेत. चालू आठवड्यात ती आणखी तीव्र होत जातील.काही ठिकाणी कांद्याचे लिलाव बंद ठेवण्याचाही पवित्रा शेतकरीवर्गाने घेतला असला तरी या नाशवंत पिकाचे आयुर्मान लक्षात घेता, शेवटी नमते कोणाला घ्यावे लागणार, हेही स्पष्टच आहे. वास्तविक, मागील तीन दशकांपासून कोणत्याच सरकारला ठोस उपाय करता न आल्याने कांदाप्रश्न 'मागील पानावरून पुढे' याप्रमाणे सुरू राहून उत्पादक वर्षानुवर्षे पिचला गेला आहे. त्याच्या दुर्दैवाचे दशावतार संपायला तयार नाहीत आणि ते संपावेत यासाठी सरकारही तितके गंभीर नाही.

# रुग्णाकडून डॉक्टर शिकले

१८४८मध्ये शिळेत सुरुंगाची दारू ठासताना स्फोट झाला आणि लांबलचक पहार फिनियस याचा गाल, डोळा, मेंदूचा अग्रभाग भेदून कवटीबाहेर पडली. त्यामुळे यातून तो जगेल, अशी आशा लोकांनी सोडली होती. पण तो रुग्णालयात पोहोचेपर्यंत शुद्धीत होता. पुढेही बारा वर्षे जगला.डोळे मिटल्यावर चाचपडावे लागते. अंगठा बांधला, तर वस्तू उचलणे अवघड होते. मेंदू आठवणी साठवतो, निर्णय घेतो. अतिमहत्त्वाचा असूनही, मेंदूचे काम हृदय, फुप्फुसांच्या मानाने उशिराच कळले. मेंदूविज्ञानात फिनियस गेज या पंचविशीतील अपघातग्रस्ताने मोलाची भर घातली. १८४८मध्ये शिळेत सुरुंगाची दारू ठासताना स्फोट झाला आणि लांबलचक पहार फिनियस याचा गाल, डोळा, मेंदूचा अग्रभाग भेदून कवटीबाहेर पडली. त्यामुळे यातून तो जगेल, अशी आशा लोकांनी सोडली होती. पण तो रुग्णालयात पोहोचेपर्यंत शुद्धीत होता. पुढेही बारा वर्षे जगला.पावणेदोनशे वर्षांपूर्वी डॉक्टरांनाही मेंदूचा कोणता भाग काय करतो, हे माहीत नव्हते. हळूहळू आपले मेंदू–ज्ञान वाढले. अन्य प्राण्यांच्या मेंदूपेक्षा मानवी मेंदू मोठा, सव्वा किलो वजनाचा असतो. मेंदूचे पुढचा, मधला, पाठचा असे भाग असतात. पुढच्या, मधल्या मेंदूचे खाचेने अर्ध–दुभाजित डावे, उजवे अर्धगोल असतात. मेंदूवर तीन आवरणे असतात, त्यातील बाहेरचे दृढ, मधले जाळीसारखे द्रवयुक्त आणि आतील मऊ आवरण असते. शरीरांतर्गत भागांतून येणाऱ्या संवेदनांतून मेंदूला वेदना जाणवतात. मेंदूला इजा झाली, तर मात्र मेंदूला वेदना होत नाहीत. फिनियसचा मेंदू कापला





गेला, पण तो आक्रोशतही नव्हता.लाखो वर्षांच्या उत्क्रांतीत चेतासंस्था बदलली. मानवी मेंदूचा अग्रभाग इतर प्राण्यांच्या तुलनेत खूप वाढला. मेंदूतळाकडचा जुना भाग हृदयक्रिया, श्वसनासारख्या अत्यावश्यक कामांचे नियंत्रण करणारा, जीवनावश्यक राहिला. मेंदूचा कपाळाकडील भाग आकलन, विचार, भावनानिर्मिती–नियमन, वागणुकीत सहभागी असतो. अग्रमेंदू गेल्याने फिनियसचे व्यक्तिमत्व आमूलाग्र बदलले. विचारी, सौम्य, मितभाषी, लोकप्रिय असणारा फिनियस दारुडा, भांडखोर, निष्काळजी झाला, नोकरी गमावून बसला. मानवी मेंदूचे तुकडे प्रयोग म्हणून कापणे अशक्य होते, त्याकाळी अपघातग्रस्त फिनियसकडून डॉक्टर आणि मानसशास्त्रज्ञांना मन–मेंदूच्या आंतरसबंधांबद्दल नवे ज्ञान मिळवता आले. पुढेही मेंदूला जखमा झालेल्या रुग्णांच्या निरीक्षणांतून चेता–मानसशास्त्रज्ञ, वैद्यकतज्ज्ञ शिकतच राहिले.

# हडपसर ते दिवे घाट रस्ता होणार चौपदरी;केंद्राकडून ७९२.३९ कोटींचा निधी मंजूर; पालखी मार्गावरची वाहतूक कोंडीची समस्या सुटणार



**पुणे**–पालखी महामार्गावरील हडपसर ते दिवे घाट या अंतराचे चौपदरीकरण आणि दुरूस्तीसाठी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालयाने ७९२.३९ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पोस्ट करत याबाबत माहिती दिली आहे.हडपसर ते दिवे घाट या पालखी महामार्गावर सातत्याने वाहतूक कोंडी तसेच रस्त्यावरील खड्ड्यामुळे वाहनचालकांना कसरत करावी लागते. याशिवाय घाट भाग हा वन विभागाच्या हद्दीत असल्याने रुंदीकरणास अडथळे येत होते. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे या सातत्याने या रस्त्याच्या कामासाठी केंद्रीय महामार्ग मंत्रालयाकडे पाठपुरावा करत होत्या. खासदार शरद पवार यांनीही याबाबत केंद्राकडे शब्द टाकला होता. त्याला अपेक्षित यश आले असून नुकतेच काही दिवसांपूर्वी निविदा काढण्याचे आदेश देण्यात आले. त्यावेळी ३९९.०२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. त्यात आता वाढ करण्यात आली असून ७९२.३९ इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या पाठपुराव्याला प्रतिसाद देत निधी मंजूर केल्याबद्दल केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.या निधीसाठी खासदार सुळे यांनी गडकरी यांचे आभार मानले असून हे काम पूर्ण झाल्यावर हडपसर ते दिवे घाट या मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच अंशी दूर होणार आहे, असे त्यांनी म्हटले आहे. या मार्गावरुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी जाते. हा पालखी सोहळा देखील अतिशय उत्तम पद्धतीने पार पडू शकेल, असेही त्यांनी पुढे नमूद केले आहे.

# शरद पवारांचा मराठा आरक्षणाला विरोध:त्यांनी मुद्दाम दोन समाजाला झुंजवत ठेवल–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर–**शरद पवारांनी मराठा आरक्षणाला सर्वात मोठा विरोध केल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी केला. शरद पवारांना मंडल आयोगावेळीच मराठा समाजाला आरक्षण देता आले असते, पण त्यांनी स्वतःच्या नेतेपदासाठी मुद्दाम २ समाजांना झुंजवत ठेवले, असे ते म्हणाले. ते नागपुरात भाजपच्या पदाधिकारी मेळाव्यात बोलत होते.दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणाशिवाय दुसरे प्रश्न नाहीत का? असे वक्तव्य सुप्रिया सुळे यांनी केल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. शरद पवार यांच्या मनात असते तर त्यांनी मंडल आयोगाच्या वेळीच मराठा समाजाला आरक्षण दिले असते असे फडणवीस म्हणाले. त्यांना कधी मराठा समाजाला आरक्षण द्यायचेच नव्हते. त्यांना फक्त दोन समाजाला झुंझवत ठेवायचे होते असे म्हणत फडणवीसांनी शरद पवारांवर टीका केली.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आपले सरकार आहे. दोन्ही निवडणुका तिनही पक्ष एकत्र लढतील. कुणाला किती जागा मिळतील. याची काळजी करु नका. तुमच्या मनात आहेत तेवढ्या जागा आपल्याला मिळणार आहेत. त्यापेक्षा कमी मिळणार नाही. ज्या जागा आपण लढत नाही तिथे जो निवडून येईल तो देखील मोदींना पाठिंबा देईल, असे त्यांनी म्हटले आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रत्येक निवडणूक ही आव्हान म्हणून घ्यायची असते. ५ राज्यांची लोकसभा निवडणूल लोकसभेती तयारी म्हटले जात होते. मात्र लोकांनी ठरवले आहे की देशाची सूत्र मोदींच्या हातात द्यायची. देशातील समान्य माणसाच्या मनात खात्री आहे की या देशाला फक्त नरेंद्र मोदी विकसीत करु शकतात. राहुल गांधींनी सगळ्या राज्यात जाऊन ७ आश्वासन दिले होते. मात्र लोकांनी ते नाकारल्याचे फडणवीस म्हणाले आहेत. तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या बाबतीत आपली ताकद आपले नेतृत्व आहे. विरोधी पक्षांनी मिळून इंडिया आघाडी तयार केली. फक्त मोदींना हरवणार हा त्यांच्या हेतू आहे. मात्र पाच राज्यांची निवडणुकीत त्यांना कळाले. त्यांच्यासमोर कुठला अजेंडा नाही, महाविजय २०२४ हे आपले ध्येय आहे. विजयाची भावना घेऊन आपल्याला मैदानात उतरणार आहे. मोदींच नाव आहे म्हणून अतिआत्मविश्वात राहू नका, अशा भावनेत गेला तर मोदींची मेहनत करतात त्याला साजेशे आपल काम होणार नाही. पुढचे ९ ते १० महिने पक्षासाठी द्यावे लागतील, असे म्हटले आहे.



# सरकारजवळ केवळ १ आठवडा:मुदतीत आरक्षण द्या

## अन्यथा गंभीर परिणाम भोगा–बच्चू कडू

**अमरावती–**मराठा समाजाचा सरसकट ओबीसीत समावेश करण्यासाठी नेते मनोज जरांगे-पाटील यांनी सरकारला २४ डिसेंबरची मुदत दिली होती. ही मुदत संपवण्यासाठी काही दिवसांचा कालावधी उरला आहे. जरांगे-पाटलांनी १७ डिसेंबरला आंतरवाली सराटी येथे मराठा समाजाच्या बैठकीचे आयोजन केले आहे. या बैठकीत आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे. अशातच प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनीही सरकारला इशारा दिला आहे.अमरावती येथे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आमदार कडू यांनी शनिवारी (ता. १६) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. २४ डिसेंबरपर्यंतची वेळ जरांगे यांनी सरकारला दिली आहे. या मुदतीत सरकारला मराठा आरक्षण द्यायचे आहे. अशात जरांगे यांनी तिसऱ्या टप्प्यातील आंदोलन सुरू केल्यास त्याचे गंभीर परिणाम सरकारला भोगावे लागतील, असा इशाराही कडू यांनी दिला



आहे.बच्चू कडू म्हणाले की, १७ डिसेंबरला जरांगे-पाटील नवीन आंदोलनाची घोषणा करणार आहेत. जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांचा अहवाल सरकारने दिला नाही. सरकारने जरांगे-पाटलांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता केली पाहिजे. आश्वासनांची पूर्तता केली नाही तर आम्हाला जरांगे-पाटलांच्या आंदोलनात सहभागी व्हावे लागेल. जरांगे-पाटलांनीही शुक्रवारी ( १५ डिसेंबर ) सरकारला इशारा दिला आहे. मराठा आरक्षणासाठी सरकारने आतापर्यंत काय कार्यवाही केली? हे १७ डिसेंबरपर्यंत कळवावे. तुम्ही मराठ्यांची फसवणूक करत असल्याचा संशय आम्हाला येत आहे. १७ डिसेंबरला आम्ही आंदोलनाचा निर्णय घेतला की तुमचा आणि आमचा विषय संपला, असे जरांगे-पाटलांनी सरकारला ठणकावले आहे.बच्चू कडू म्हणाले की, सरकारने मराठा आरक्षणाच्या विषयावर कोणताही दगाफटका केल्यास आपण स्वत: आंदोलनात सहभागी होऊ, असे आपण यापूर्वीच स्पष्टपणे जाहीर केले आहे. आता सात दिवसात आरक्षण न मिळाल्यास मनोज जरांगे पाटील पुन्हा तिसऱ्या टप्प्यातील आंदोलन सुरू करण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे झालच तर आपण आंदोलनात सर्वांत पुढे असू, मग आपण सरकारचा कोणताही मुलाहिजा बाळगणार नाही, असा इशाराही आमदार बच्चू कडू यांनी सरकारला दिला आहे.

# नको त्या माणसांच्या हातात सत्ता असल्यामुळे आपल्याला भीक मागावी लागत आहे–जानकर

**वर्धा–**एकाच व्यक्तीला खलनायक करुन जमणार नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या घटनेचा अधिकार हिसकावून घेता येणार नाही. ज्या ओबीसी समाजामध्ये ३७४२ जाती आहेत, त्या देशावर खरे तर ओबीसींचे राज्य असायला हवे होते. पण नको त्या माणसांच्या हातात सत्ता असल्यामुळे आपल्याला भीक मागावी लागत असल्याचा टोला रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी वर्ध्यातील ओबीसी उल्गार मेळाव्यात लगावला आहे.दरम्यान महादेव जानकर पुढे बोलताना म्हणाले की, ज्यांची लायकी नाही तो सत्तेत बसला आहे, आमची लायकी असताना आम्हाला सत्तेत बसता येत नाही ही व्यवस्था बदलली पाहिजे असा घणाघात जानकरांनी केला आहे. तर ओबीसींनो तुम्ही जागे झाले पाहिजे. आम्ही हे जे करतोय ते समाज बांधवांसाठी करत आहोत. संविधान सभेत बाबासाहेबांना विरोध करणारी माणसे होती पण एकटउा वाघ लढला आणि ३४९



वे कलम लागू केले. आमच्यावर देखील तीच वेळ आली आहे. आम्ही खलनायक नाही, छत्रपती शाहू महाराजांनी आम्हाला आरक्षण दिले आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने आम्हाला आरक्षण दिले आहे.महादेव जानकर म्हणाले की, वडार, कैकाडी, म्हसन जोगी या सारख्या समाजाची काय अवस्था आहे, असा सवाल त्यांनी यावेळी बोलताना उपस्थित केला आहे. हे समतेचे राज्य आहे का? अनेक जातीतील पोरं कुठेच मोठ्या पदावर दिसून येत नाही. ओबीसींच्या हक्कांना धक्का लागणार नाही, यासाठी आम्ही सर्व जण प्रयत्नशील आहोत. मी माझ्यापक्षाकडून खासदार असणार असा दावाही त्यांनी यावेळी केला आहे.महादेव जानकर म्हणाले की, ज्या आमदारकी आणि मंत्रीपदातून समाजाचे हित होत नसेल तर अश्या पद आम्ही फेकून देतो. आम्ही जर ८५ टक्के असू तर १५ टक्के असणाऱ्यांकडे आम्ही का मागायचे असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला आहे. आमचा राजकीय हक्क कोण हिरावून घेऊ पाहतोय हे देखील आम्हाला माहिती आहे. आम्ही छगन भुजबळांचे कार्यकर्ते ओबीसी समाजासाठी म्हणून काम करु असेही त्यांनी म्हटले आहे.

# ठाकरेंवर जनतेचा विश्वास नाही:महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याची हिंमत कुणाच्या बापात नाही–बावनकुळे

**मुंबई–**मुंबईमध्ये ठाकरे गटाच्या वतीने धारावीच्या प्रश्नांसाठी धारावी बचाओ मोर्चा काढण्यात आलेला आहे. या मोर्चामध्ये स्वतः उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि ठाकरे गटाच्या महत्त्वाच्या नेत्यांचा समावेश आहे.ठाकरे गटाच्या मोर्चाच्या अनुषंगाने भाजपच्या वतीने पत्रकार परिषद घेण्यात आली होती. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार आसूड ओढला. उद्धव ठाकरेंना संधी असतानाही त्यांनी कधी धारावीचा विकास केला नाही. आता आमचे सरकार काम करण्याचा प्रयत्न करत आहे, तर ते विरोध करत आहेत.दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राची जनता उद्धव ठाकरेंवर विश्वास ठेवत नाही. जेव्हा स्वतःच्या निष्क्रियतेला सक्रियता दाखवावी लागते, तेव्हा असे प्रयत्न करावे लागतात. धारावीच्या विकासासाठी सरकार सर्वोतोपरी प्रयत्न असून जनताही धारावीच्या विकासाच्या बाजूने आहे.मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव असल्याचा आरोप ठाकरे गटाकडून भाजपवर केला. त्यावर बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याची हिंमत कुणाच्या बापात नाही, कोणत्याही पक्षात ती हिंमत नाही.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, जनतेला कन्फ्युज करण्यासाठी हे बोललेजात आहे. धारावी पुनर्विकास प्रकल्प उद्धव ठाकरेंना करता आला असता, परंतु त्यांना ते करता आले नाही... आता मात्र मोर्चा काढत आहेत. धारावीकरांचे जीवनमान उंचावणार आहे, अशावेळी उद्धव ठाकरे विरोध करतायत असे म्हणत बावनकुळे यांनी ठाकरेंच्या आंदोलनावर जोरदार टीका केली.धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी उद्योग समूहाला देण्यात आला असून अदानी समूहाकडून



या पुनर्विकासाचा कोणताही मास्टर प्लान देण्यात आलेला नाही. त्या विरोधात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात महामोर्चा काढण्यात आला आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर धारावीत मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. उद्धव ठाकरे या मोर्चात सहभागी झाले आहेत.यावेळी हजारो शिवसैनिकासह धारावीतील लाखो नागरिक देखील यात सहभागी झाले आहेत.धारावीच्या विकासाला आमचा आजिबात विरोध नाही, पण धारावीत राहणाऱ्या प्रत्येकाला ५०० स्केअर फुटांचे घर मिळावे, काही कारणं चालणार नाही असा इशारा उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारला दिला. धारावीकरांना जिथल्या तिथे घर द्या, व्यवसायाला जागा द्या, धारावीतील कोळीवाडा आणि कुंभारवाड्याला वेगळी जागा द्या, अन्यथा आम्ही शांत बसणार नाही असा इशाराही उद्धव ठाकरे यांनी दिला.गेली अनेक वर्षे या प्रकल्पाची चर्चा सुरू आहे. गरज पडली तर मुंबईच काय तर आख्खा महाराष्ट्र धारावीत उतरवेन. ज्यांनी धारावीची सुपारी घेतलीय त्यांनी समजून घ्यावे हा अडकित्ता आहे, त्याने ठेचले तर पुन्हा नाव घेणार नाही असा इशारा त्यांनी भाजपला दिला. जे व्यवसाय गुजरातला गेले ते धारावीत परत आणा, सुरतला नेलेले आर्थिक केंद्र धारावीत झाले पाहिजे अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

# धारावी प्रकल्पात टीडीआर घोटाळा असेल तर ते पाप उद्धव ठाकरेंचे–आशिष शेलार

**नागपूर–**धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून ठाकरे गटाने अदानी समूहविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. या टेंडरच्या अटी, कार्यपद्धतीचे आणि त्याबाबतीतले धोरणात्मक निर्णय उद्धव ठाकरेंच्याच काळात झाले आहेत. टेंडरमध्ये गडबड असेल, टीडीआर घोटाळा असेल तर सर्वस्वी पाप उद्धवजींचे आहे, असा घणाघात भाजपचे नेते आशिष शेलार यांनी केला आहे.दरम्यान धारावी पुनर्विकास प्रकल्पावरून ठाकरे गटाने आज मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्च्याला ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे संबोधीत करणार आहेत. तसेच, आज पत्रकार परिषद घेऊन ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी भाजप आणि अदानींवर घणाघात केला. धारावी पुनर्विकास प्रकल्प हा देशातील सर्वांत मोठा टीडीआर प्रकल्प असल्याचा आरोप संजय राऊतांनी केला. त्यांच्या या टीकेवर मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी प्रत्युत्तर दिले आहे.आशिष शेलार म्हणाले की, मुंबईत उबाठाबाबत एकच चर्चा, धारावीतून निकालेंगे मातोश्री टू का खर्चा, अशी काव्यात्मक टीका आशिष शेलार यांनी केली. हा हसवणूक आणि फसवणुकीचा धंदा आहे. ५०० फुटांची घरे हवी होती तर मग मुख्यमंत्री असताना उद्धव ठाकरेंनी तशी अट का घातली नाही? आज तुम्हाला उपरती का झाली का? मुंबईला आणि राज्याला काही विकासातून मिळाले की ज्यांची पोटदुखी होते ते म्हणजे ठाकरे गट. त्यामुळे त्यांच्या पोटदुखीचा हा कार्यक्रम आहे, असा पलटवार आशिष शेलारांनी केला आहे.पवारांनी दिल्लीतून फोन केला का?आशिष शेलार म्हणाले की, धारावीतून निघाणाऱ्या ठाकरे गटाच्या मोर्चाला थांबवण्याकरता दिल्लीतून दबाव आहे, अशी टीकाही संजय राऊतांनी केली. त्यावर आशिष शेलार म्हणाले की, तुमच्यावर कोणाचा दबाव होता मग? तुमच्यावर शरद पवारांचा दबाव होता का? पवारांनी दिल्लीतून फोन केला होता का? संजय राऊत रोज गांजा आणि चिलीम ओढूनच पत्रकार परिषदेला बसतात. त्यामुळे त्यांच्या म्हणण्यात सातत्य आणि सत्यता नसते.

# भारतीय संविधानामुळेच नागरिकांच्या सर्वांगीण विकासामध्ये परिवर्तन–तानाजी सूर्यगंध सर

**सांगोला–**भारतीय संविधानाविषयी सर्व विद्यार्थ्यांना परिपूर्ण माहिती व्हावी, या उद्देशाने न्यू इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज सांगोला मध्ये भारतीय संविधान याविषयी व्याख्यानाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोलाचे पर्यवेक्षक श्री. तानाजी सूर्यगंध सर लाभले होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे प्राचार्य हेमंत अदलिंगे होते. आपल्या मार्गदर्शनपर मनोगतामध्ये बोलत असताना प्रमुख पाहुणे लाभलेले तानाजी सूर्यगंध सर यांनी असे सांगितले की,जुन्या कायद्यामुळे भारतीय समाजामध्ये अस्पृश्यता, असमानता, उच्च-नीच भेद-भाव, स्त्री- पुरुष भेदभाव होता. समाजामध्ये कर्म-कांड,अंधश्रद्धा, उपास-तापास, नवस-सायास, ज्योतिष-भविष्य, पंचांग पाहणे, मुहूर्त काढणे, या कायद्यामुळे भारतीय समाजाला शिक्षण नाकारले होते आणि संपूर्ण भारतीय समाज अज्ञान व घोर अंध:कारात बुडाला होता, भारतीय समाजाची प्रगती खुंटली होती,विकासाच्या वाटा बंद झाल्या होत्या, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाणले म्हणून २५ डिसेंबर १९२७ साली रायगडाच्या पायथ्याशी महाड येथे या जुन्या कायद्याच्या पुस्तकाचे स्वतःच्या हाताने दहन केले .पुस्तकांवर जीवापाड प्रेम करणारा हा महामानव एका पुस्तकाचे दहन करतो यावरून ते पुस्तक किती विषारी (घातक )असेल, याची प्रचिती आपल्याला मिळू शकेल. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला संविधान बहाल केले व २६ जानेवारी १९५० रोजी अंमलबजावणी करण्यात आली. हा नवा कायदा व नवीन समाजव्यवस्था आहे. या भारतीय संविधानामध्ये प्रत्येक भारतीयांना त्याचे हक्क व अधिकार प्राप्त झाले. या संविधानामुळेच शाळा, कॉलेज सुरू झाल्या. त्यामुळे सामान्य माणूस शिक्षण घेऊ लागला व संविधानानुसार भारतीय प्रशासन व्यवस्थेमध्ये चतुर्थश्रेणीपासून ते भारतीय प्रशासन व्यवस्थेचे सर्वोच्च पद-राष्ट्रपती, या पदापर्यंत भारतातील प्रत्येक माणसाला पोहोचण्याची संधी उपलब्ध झाली. त्यामुळे भारतीय संविधान हे प्रत्येक भारतीयांचा श्वास आहे, जीव की प्राण आहे, सन्मान आहे, विकास आहे, उन्नती आहे. हेच भारतीय संविधान प्रत्येक भारतीय नागरिकांनी वाचले पाहिजे आणि त्या संविधानामध्ये मला कोणते अधिकार आहेत हे प्रत्येकाने पाहिले पाहिजे.आज संविधान लागू होऊन ७३ वर्ष पूर्ण झालेली आहेत, तरी भारतीय लोकांना हे संविधान माहीत नाही. आम्ही प्रत्येक जण संविधानातील प्रत्येक कलमाचा फायदा घेतो, परंतु आमची वाटचाल जुन्याच कायद्याप्रमाणे आहे. जर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतातील सर्व लोकांनी ऐकले असते तर भारत देश




लवकरच महासत्ता झाला असता, अजूनही वेळ गेलेली नाही, प्रत्येकाने भारतीय संविधानाचे वाचन केले पाहिजे आणि भारतीय संविधान समजून घेतले पाहिजे. म्हणजे प्रत्येक भारतीयांचे प्रश्न आपोआपच संपतील असे सांगितले.तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लहानपणापासूनच गौतम बुद्धाच्या पंचशील तत्वाची शिकवण आत्मसात केली. म्हणून त्यांच्या संपूर्ण चारित्र्यावर कोणत्याही प्रकारचा डाग दिसून येत नाही. त्यांचे चारित्र पारदर्शक होते. केवळ गौतम बुद्धांच्या शिकवणुकीमुळे ते महाज्ञानी प्रकांड पंडित, विश्व भूषण व आधुनिक बुद्ध बनले. यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरा यांच्या चारित्राचा अभ्यास करून त्यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन केले.अध्यक्षीय मनोगता मधून भारतीय संविधान विषयी बोलत असताना प्राचार्य हेमंत आदलिंगे यांनी असे सांगितले की, संविधान सभेची पहिली सभा ९ डिसेंबर १९४६ रोजी पार पडली. संविधान सभेमध्ये सुमारे २९९ सदस्य होते. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे प्रमुख होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली.मसुदा समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला, असे सांगून संविधानाविषयीची पार्श्वभूमी स्पष्ट केली.प्रारंभी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला चे पर्यवेक्षक श्री तानाजी सूर्य गंध सर यांचा यथोचित सत्कार कॉलेजचे प्राचार्य हेमंत आदलिंगे, उपप्राचार्य केशव माने, संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोक शिंदे,प्रा. दीपक खटकाळे प्रा. जयंत जानकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी कार्यक्रम आयोजन समितीचे प्रमुख प्रा. चंद्रकांत इंगळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मिलिंद पवार, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज सांगोला मधील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. देवेन लवटे यांनी केले तर आभार पांढरे सर यांनी मानले.

# जातीय सलोखा व सामाजिक सद्भावना उपक्रम अंतर्गत हिंगोली जिल्हा पोलीस दलाकडून रक्तदान शिबिर आयोजन

## शिबिरामध्ये एकूण ८० रक्तदात्यांनी केले रक्तदान

**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक श्री जी श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हा पोलीस दलाकडून नेहमीच शिबिर सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात जनता व पोलीस यामधील संबंध अधिक जवळ व्हावे याकरिता तसेच जातीय सामाजिक सलोखा अबाधित राहून शांतता नांदावे यासाठी जिल्हा पोलीस प्रशासन सदैव प्रयत्न करीत आहे याचाच एक भाग म्हणून सदर उपक्रमा मार्फत संत नामदेव पोलीस कवायत मैदानावर एकता क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे सध्या हिंगोली जिल्ह्यात रक्तपेढीमध्ये रक्ताची कमतरता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक



श्री.जी श्रीधर यांच्या पुढाराकारातून तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथील रक्तपेढी रक्तकीट यांचे सहकार्यातून आज १६ १२ २०२३ रोजी संत नामदेव पोलीस कवायत मैदान येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदर शिबिराचे उद्घाटन पोलीस अधीक्षक श्री जी श्रीधर अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील प्रभारी जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.मंगेश टेहरे अतिरिक्त जिल्हा शैलचिकित्सक डॉ. दीपक मोरे यांच्या हस्ते करण्यात आले या प्रसंगी वैद्यकीय अधिकारी व डॉ. स्वाती नुनेवार, डॉ.कंठे पोलीस निरीक्षक विलास पाटील पोलीस निरीक्षक नरेंद्र पापळकर राखीव पोलीस निरीक्षक अलीमुद्दीन शेख सह पोलीस निरीक्षक राजेश मलपिल्लू पोलीस अधीक्षक अमलदार तथा जिल्हा रक्तपेढी व रक्तदान केंद्रातील कर्मचारी हजर होते या रक्तदान उपक्रमाच्या माध्यमातून पोलीस अंमलदार व हिंगोली शहरातील नागरिक यांनी मिळून या सामाजिक उपक्रम रक्तदान शिबिरामध्ये ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## श्रीक्षेत्र पैठणच्या संतपीठाचा दुसरा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**पैठण । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संचलित, श्रीक्षेत्र पैठण येथील संतपीठाचा दुसरा प्रमाणपत्र वितरण सोहळा दिनांक १६ डिसेंबर शनिवार रोजी उत्साहात संपन्न झाला. जायकवाडी धरणाच्या पायथ्याशी असलेल्या संतपीठाच्या इमारतीत कुलगुरु डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला. यावेळी प्रकुलगुरु डॉ. श्याम शिरसाठ, कुलसचिव डॉ. भगवान साखळे, समन्वयक डॉ. प्रवीण वक्ते, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अपर्णा पाटील, नितीन जाधव, श्रीमती ज्योती येवले, माजी उपमहोपौर संजय जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दोन बॅचमधील १५९ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. उपस्थितांना पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी मार्गदर्शन




केले. ते म्हणाले, मराठवाडयातील चाळीस वर्षापासूनची संतपीठाचा मागणी पूर्ण झाली. विशेषतः कुलगुरु डॉ. प्रमोद येवले यांनी शासनाच्या प्रतिसादास सकारात्मक प्रतिसाद दिला त्यामुळे संतपीठाचा प्रकल्प मार्गी लागला. मंत्री उदय सामंत व मा. ना. चंद्रकांतदादा पाटील यांची भुमिका यात महत्वाची ठरली. मराठवाडयाला मोठी संत परंपरा लाभली असून सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी त्यांचे विचार जतन केले पाहिजे. तसेच संतपीठाला कुशल मनुष्यबळ व पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहु असा विश्वास ही पालकमंत्री संदीपान भुमरे यांनी व्यक्त केला. समन्वयक डॉ. प्रवीण वक्ते यांनी प्रास्ताविक केले. डॉ. चक्रधर कोठी यांनी सूत्रसंचालन तर कुलसचिव डॉ.भगवान साखळे यांनी आभार मानले.

## वाशीम येथे सामाजिक समस्यांवर चर्चासत्र माहेश्वरी समाजाचे राष्ट्रीय पदाधिकारी शहरात

**वाशीम । प्रतिनिधी**

विदर्भ प्रादेशीक माहेश्वरी , युवा , महिला संघटन, वाशिम जिल्हा माहेश्वरी संघटन, युवा संघटन, महिला संघटन वाशीम, तालुका माहेश्वरी संघटन, युवा संघटन, महिला संघटन वाशीम संघटनेच्या वतीने रविवार १७ डिसेंबर रोजी स्थानिक महेश भवन येथे दुपारी ३ वाजता एकमेकांपासून दुपार होणारे भांवडे, दाम्पत्य, तुटणारे नाते, परिवार, व युवा पिढीवर कमी होत चालले संस्कार या विषयावर प्रमुख वक्त्या चेतना लहरच्या प्रदेश संयोजिका किरण मुंदडा यांचे सामाजिक समस्यांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महासभाचे माजी सभापती श्यामसुंदर सोनी, युवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद सोनी आदिं समवेत मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

१७ डिसेंबर रोजी विदर्भ प्रादेशीक माहेश्वरी संघटनेची व्दितीय





सभा पार पडणार असून त्याचे आतिथ्य वाशीम जिल्हा माहेश्वरी संघटनेला मिळाले आहे. सकाळी ९ वाजता नोंदणी, १० वाजता प्रथमसत्र सभा, १२ वाजता व्दितीय सत्र सभा, दुपारी २ ते ३ तृतियसत्र सभा, दुपारी ३.३० ते ५ चेतना लहर अंतर्गत सामाजिक समस्यांवर चर्चासत्र होणार आहे. कार्यक्रमाला युवा संघटनचे प्रदेशअध्यक्ष व राष्ट्रीय अध्यक्ष यांचेही मार्गदर्शन प्रदेश महिला संघटनेचा अहवाल ठेवण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाला जिल्हयातील सर्व पदाधिकारी तथा चर्चासत्र कार्यक्रमाला दुपारी महिला व समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष कैलास मुंदडा, सचिव सुनिल गट्टाणी, प्रदेश संयुक्त मंत्री शिवलाल भुतडा, युवा संघटन जिल्हाध्यक्ष डॉ. रोशन बंग, तालुकाध्यक्ष आशिष हुरकट, युवा संघटन तालुकाध्यक्ष ललित राठी व पदाधिकारी यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महासभाचे राष्ट्रीय संयोजक अनिल राठी करणार आहेत.

## सेंट पॉल्स् हायस्कूलचा क्रिडा दिन उत्साहात साजरा

**पैठण । प्रतिनिधी**

पैठण औद्योगिक परीसरातील सेंट पॉल्स् हायस्कूलचा क्रीडा दिन शुक्रवार, दि. १५ डिसेंबर रोजी शाळेच्या प्रांगणात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी छत्रपती संभाजीनगर धर्मप्रांताचे बिशप अँब्रोस रिबेलो यांचे हस्ते क्रीडाध्वजरोहन तर प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले पैठण औद्योगिक परीसरातील मॅट्रीक्स लाईफ सायन्स प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक कुनाल सिकची यांचे हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलीत करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर धर्मप्रांताचे विकर जनरल डॉ. व्हलेरीयन फर्नांडीस, एसएफएस शिक्षण संस्थेचे सचिव फा. विल्फ्रेड सलढाना, अनेक धर्मगुरू, धर्मभगीनी, प्रतिष्ठीत नागरिक, पालक, शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येत सोहळा पार पडला. रंगारंग व वैविध्यपूर्ण क्रीडा देखाव्याने सर्व उपस्थितांच्या डोळयाचे पारणे फेडले. विद्यार्थ्यांसोबत पालकांसाठी सुद्धा काही निवडक क्रीडाप्रकारांचे आयोजन करून विजेत्यांना प्रमाणपत्रे व पदके देवून गौरविण्यात आले. पालकांसाठी आयोजिलेल्या संगीत खुर्ची व बॉंबींग द सिटी क्रीडा प्रकारामुळे कार्यक्रमात मोठी रंगत भरली. शाळेचे संस्थापक प्राचार्य रेव्ह. डॉ. व्हलेरीयन फर्नांडीस यांच्या अविरत



परिश्रम व खंबीर बाण्यामुळे शाळेचा सर्वांगीण विकास घडून येत असून क्रीडा प्रकारांमुळे येणारी पीढी मजबूत व सदृढ होईल असा विश्वास बिशप अँब्रोस यांनी व्यक्त केला. शाळेच्या होत असलेल्या सर्वांगीण विकासाविषयी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कुनाल सिकची यांनी समाधान व्यक्त केले, तर एसएफएस शिक्षण संस्थेचे सचिव फा. विल्फ्रेड सलढाना यांनी शाळेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे संस्थापक प्राचार्य रेव्ह. डॉ. व्हलेरीयन फर्नांडीस यांनी पैठणसारख्या ग्रामिण भागातील ही शाळा उतरोत्तर प्रगतीपथावर कशी वाटचाल करीत आहे याचा आढावा घेतला. शाळेचे प्रभारी मुख्याद्यापक प्रभाकर बांगर व पर्यवेक्षक बाळासाहेब थोटे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच इतर शिक्षकवृंदाच्या परिश्रमाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शीला मनवर व श्रीमती स्मीता कुलकर्णी यांचे मार्गदर्शानाखाली किशोर गोरे व श्रेया पाटील या विद्यार्थीद्वयांनी तर आभार प्रदर्शन अब्रारूल हक यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

## भारत तिबेट सहयोग मंचातर्फे आयोजीत व्याख्यानाला उत्सुर्फत प्रतिसाद



**पुणे (प्रतिनिधी)**

भारत तिबेट सहयोग मंचतर्फे पुणे येथील एस. पी. कॉलेजच्या लेडी रमाबाई आंबेडकर सभागृहात आयोजीत भारतीय एकात्मता या विषयावर भाजपा चे माजी राष्टीय सचिव पुर्वोचल येथील विजयाचे शिल्पकार सुनिलजी देवधर यांनी व्याख्यान दिले,तर भारत तिबेट सहयोग मंचचे मार्गदर्शक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ चे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेशजी यांनी विचार व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ड ए. के जैन भारत तिबेट सहयोग मंचाचे राष्ट्रीय सचिव नरसिंग मेगजी यांची प्रमुख उपस्थितीत होती .या कार्यक्रमात भारत तिबेट सहयोग मंचाचे क्षेत्रिय संयोजक मोहन बागमार प्रांत संयोजन विशाल कणसे. पुणे महानगर संयोजन चेतन शर्मा पुणे महानगर संहसयोजक नितीन मुळीक, सुनील देवभानकर आदी उपस्थित होते,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्का मोकासदार यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजक क्षेत्रीय संयोजक मोहन बागमार व सहकारी यांनी विशेष परिश्रम घेतले,

## मुळुकवाडी ग्रामस्थांनी आपला संकल्प विकसित भारत केंद्र सरकारची यात्रा वेशीवरुनच लावली परत– डॉ.गणेश ढवळे

**पाटोदा/प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी योजनांचे फायदे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावेत या उद्देशाने आपला संकल्प विकसित भारत योजना दि.१५ नोव्हेंबर ते २६ जानेवारी कालावधीत देशव्यापी मोहीम केंद्र सरकारच्या वतीने राबविण्यात येत असुन दिनांक १६ डिसेंबर-२०२३ शनिवार रोजी बीड तालुक्यातील मौजे मुळुकवाडी या ठिकाणी सकाळी यात्रा आली असता मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण देण्यात यावे या प्रमुख मागणीला पाठिंबा देण्यासाठी गेल्या १५ दिवसांपासून साखळी उपोषणास बसलेल्या ग्रामस्थांनी यात्रारथ गावच्या वेशीजवळ आल्यानंतर एक मराठा लाख मराठा घोषणा देत मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत शासनाने आमच्या दारी येऊ नये म्हणत घोषणाबाजी करत परतुन लावला. या वेळी मराठा कुणबी आरक्षण प्रश्नावर ग्रामस्थांनी शासना विरोधात तिव्र संताप व्यक्त केला. या वेळी सरपंच रामकिसन कदम, उपसरपंच



पांडुरंग कानडे, भास्कर ढास, बालासाहेब ढास, प्रविण ढास, खंडु ढास, दादा कदम, वैजनाथ कदम, रघुनाथ ढास, रामहरी ढास, कृष्णा कदम, खंडु कोटुळे, दिलीप ढास, संभाजी भोसले, राजेंद्र ढास, बाळु ढास आदि ग्रामस्थ उपस्थित होते. केंद्र सरकारच्या कांदा निर्यात बंदीमुळे मुळुकवाडीकर आक्रमक असल्याचे सरपंच रामकिसन कदम यांनी या वेळी सांगितले. मुळुकवाडी मधील ७५ टक्के



शेतकरी कांदा उत्पादक असुन केंद्र सरकारच्या अकस्मात कांदा निर्यात बंदीच्या निर्णयानंतर कांद्याच्या दरात तब्बल अडीच ते ३ हजार रूपयांनी घसरण झाली असुन कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असुन शेतकऱ्यांच्या केंद्र सरकार विषयी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी उठवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .